**मटा अँकर** राष्ट्रपती मुर्मू यांच्या हस्ते साहित्य सोहळ्याचे उद्घाटन

# ‘मानवी मूल्ये हीच साहित्याची ओळख’

म. टा. विशेष प्रतिनिधी, नवी दिल्ली

'आजच्या बदलत्या काळातील साहित्य हे उपदेशात्मक असू शकत नाही. कायमस्वरूपी मानवी मूल्यांची स्थापना हीच कालातीत साहित्याची ओळख आहे,' असे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुरुवारी येथे केले.



साहित्य अकादमी आणि राष्ट्रपती भवन सांस्कृतिक केंद्रातर्फे राष्ट्रपती भवनात आयोजित केलेल्या दोनदिवसीय साहित्य सोहळ्याचे उद्घाटन राष्ट्रपतींच्या हस्ते झाले, त्यावेळी त्या बोलत होत्या. केंद्रीय सांस्कृतिकमंत्री गजेंद्रसिंह शेखावत, साहित्य अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक, सचिव डॉ. के. श्रीनिवास राव आदी यावेळी उपस्थित होते.

'१४० कोटी देशवासीयांच्या आपल्या कुटुंबात अनेक भाषा आणि असंख्य बोलीभाषा आहेत आणि साहित्यिक परंपरांची विविधता आहे. परंतु या विविधतेतही भारतीयतेचे स्पंदन जाणवते. भारतीयतेची ही भावना आपल्या देशाच्या सामूहिक चेतनेत खोलवर रुजलेली आहे. सर्व भाषांमध्ये लिहिलेले साहित्य हे माझे साहित्य आहे. साहित्यातून प्रेरणा घेऊन माणूस स्वप्ने पाहतो आणि ती सत्यात उतरवतो. आज समाज आणि सामाजिक संस्था बदलल्या आहेत, आव्हाने आणि प्राधान्यक्रमदेखील बदलले आहेत आणि साहित्यातही असेच बदल दिसून आले आहेत. परंतु कायमस्वरूपी मानवी मूल्यांची स्थापना ही कालातीत साहित्याची ओळख आहे,' असे राष्ट्रपती म्हणाल्या.

या संमेलनात शीन काफ निजाम यांच्या अध्यक्षतेखाली 'सीधा दिल से' हे कवीसंमेलन आयोजित करण्यात आले होते. यात रणजीत दास (बंगाली), मामंग दाई (इंग्रजी), दिलीप झवेरी (गुजराती), अरुण कमल (हिंदी), महेश गर्ग (हिंदी), शफी शौक (काश्मीरी) आदींनी कविता सादर केल्या.

## आज ‘अहिल्याबाई गाथा’

आज, शुक्रवारी 'भारताचे स्त्रीवादी साहित्यः नवीन पायांच्या शोधात', 'साहित्यातील बदल विरुद्ध बदलांचे साहित्य', 'जागतिक संदर्भात भारतीय साहित्याच्या नवीन दिशा' या तीन विषयांवर चर्चासत्रे होतील. अखेरीस हिमांशू बाजपेयी आणि प्रज्ञा शर्मा राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त अहिल्याबाई गाथा सादर करतील.